MHKO100000542008

**नियमीत दिवाणी दावा क्र. ११/२००८**

भैरु कांबळे - म.वा. वगैरे.
विरुध्द
सखाराम कांबळे - म.वा. वगैरे.

**निशाणी क्र. ८९ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १अ ते १क यांनी त्यांचेविरुध्द झालेला "उलटतपास नाही व पुरावा बंद" चा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.२ तर्फे अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा हा हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. सदर कामी प्रतिवादी क्र.२ यांनी स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केल्यानंतर प्रतिवादी क्र.१अ ते १क यांनी उलटतपास घेतलेला नाही. तसेच, दिनांक ०६/१२/२०२२ रोजी त्यांचेविरुध्द पुरावा बंदचा आदेश पारीत करणेत आला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रकरण हे साक्षीदाराचे उलटतपासाकरीता ब-याच काळापासून प्रलंबीत आहे. त्याबाबत प्रतिवादी क्र.१अ ते १क यांनी, त्यांचेतर्फे नेमले वकील एस.बी.पाटील हे मयत झालेने प्रतिवादी यांना नेमले तारखेची समज मिळाली नाही. त्यामुळे, त्यांना न्यायालयात हजर राहून व वकील नेमून प्रतिवादी क्र.२ यांचा उलटतपास घेता आला नाही असे कारण नमुद केले आहे. परंतु, प्रकरणाची परिस्थिती व नमुद कारण पाहता सदर कारण संयुक्तीक वाटत नाही. परंतु, दाव्याचे स्वरुप पाहता दावा गुणदोषावर निकाली काढणेकरीता प्रतिवादी क्र.१अ ते १क यांना बचावाची संधी देणेदेखील योग्य वाटते. प्रतिवादी क्र.१अ ते १क यांचेमुळे झालेला विलंब व त्यामुळे प्रतिवादी क्र.२ यांचे झालेले नुकसान याकरीता सदरचा अर्ज खर्चासह मंजुर करणे योग्य होईल. त्यामुळे, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**-:आदेश :-**

०१. अर्ज रक्कम रु.५००/- (रुपये पाचशे फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

०२. खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.१अ ते १क यांनी पुढील तारखेपर्यंत साक्षीदार यांना अदा करावी. तसे न झाल्यास सदरचा आदेश रद्द समजण्यात यावा.

Digitally signed by SUJIT AMBADAS RATHOD
Date: 2023.07.15
17:46:27 +0530

**(एस.ए.राठोड)**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः १४/०७/२०२३.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S.A.Rathod,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 14/07/2023 |
| Order signed by P.O. on | 14/07/2023 |
| Order uploaded on | 15/07/2023 |